# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ११/०७/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १६ कि.मी. अंतरावरील मौजा डुमरीकला मुर्ती कंपनी येथे दिनांक ०९/०७/२०२२ चे २१.०० वा. सुमारास आरोपी क्र. १) राजु शंकर झाडे वय ४४ वर्ष कन्हान व २) जगदीश रूपचंद जैसारे वय ३१ वर्ष रा. कान्द्री कन्हान यांनी कंपनीचे भिंत चढुन कंपनीच्या आतील आवारातील दोन लोखंडी प्लेट अंदाजे ६० किलो कि. १,८००/– रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– वासुदेव केशव घोडाकाडे वय ६६ वर्ष रा. डुमरीकला यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रवि बरवे मो.क्र. ८८३०५६५०७६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा उबाळी शिवार येथे फिर्यादी नामे– मनीष ओमप्रकाश संघी, वय ४८ वर्ष, रा. नवी शुक्रवारी गांधीगेट महाल, नागपुर यांचे शेतात पाणी ओलण्याकरीता सोलर पॅनलची इलेक्ट्रीक मोटार ३ एचपी ची लावलेली होती. दिनांक ०७/०७/२०२२ चे १३.४६ वा. ते दिनांक ०८/०७/२०२२ चे ०८.०० वा. सुमारास अज्ञात आरोपीने फिर्यादीची सोलर पॅनल मोेटार एचपी ची ओस्वाल कंपनीची मोटारपंप कि. ६,०००/–रू. ची चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री राजेंद्र पाली मो.नं. ९२८४३५४६३० हे करीत आहे.

### विनयभंग

**पो.स्टे. कोंढाळी** :– दिनांक ०८/०७/२०२२ चे १६.०० वा. सुमारास फिर्यादी/पीडित वय ३० वर्ष ही एकटी घरी हजर असता आरोपी नामे– दिवाकर प्रभाकर नेहारे, वय २९ वर्ष, रा. चमेली ता. काटोल जि. नागपुर हा फिर्यादी यांच्या घराच्या मागच्या दरवाजातून अनाधिकृतपणे स्वयंपाक रूममध्ये प्रवेश करून फिर्यादी यांना मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४५२,३५४,३५४(अ) भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा गिता सहारे मो न. ९८३४८०२४१२ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर